सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : ६ जुन १९९८

**अधिसूचना**

भारताचे संविधान

क्रमांक : आरटीआर १०९५/सीआर १२१ (१)/सेवा-१ : भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि या बाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा लेख अधिक्रमित करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या, आरोग्य सेवा संचालनालयातील प्रयोगशाळा सहाय्यक या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :-

१. या नियमांना आरोग्य सेवा संचालनालयातील प्रयोगशाळा सहाय्यक (सेवा प्रवेश) नियम, १९९८ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(अ) "संचालनालय" म्हणजे आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
(ब) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन.
(क) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र एकेचाळीस) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या एखाद्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्प्याच्या अखेरीस घेतलेली विज्ञान विषयातील अंतिम परीक्षा.
(ड) "उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" म्हणजे महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र एकेचाळीस) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या एखाद्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या उच्च माध्यमिक टप्प्यावर घेतलेली अंतिम परीक्षा.

३. संचालनालयामधील प्रयोगशाळा सहाय्यक या पदावरील नेमणूक — पुढीलपैकी कोणत्याही प्रकारे करता येईल :-

(अ) तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी संचालनालयातील गट-ड पदे धारण करणाऱ्या व या नियमाच्या खंड (ब) च्या उप-खंड (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता असलेल्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीन, ज्येष्ठतेच्या तत्वावर एखाद्या योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन.

प्रयोगशाळा सहाय्यक या पदाचे
सेवा प्रवेश नियम.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक आरटीआर १०९५/सीआर १२१/सेवा-१
मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : ६ जुन १९९८

वाचा - सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे यांचे पत्र क्रमांक संसआसे/सेप्रनि/ १०+२/३३३००/कक्ष-५६,दिनांक ५ जुलै १९९७.

शासन निर्णय

सोबत जोडलेल्या अधिसूचनेस महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-४-अ, मध्ये प्रसिध्दी देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अनिस शेख)
कार्यासन अधिकारी

प्रति
संचालक,आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य) पुणे
उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे (सर्व)
सामान्य प्रशासन विभाग/१२, मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई (५ प्रतीसह)

२. त्यांना विनंती की सोबतच्या अधिसूचनेस महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४-अ मध्ये प्रसिध्दी देवून त्याच्या ३० प्रती या विभागास पाठवाव्या.

Scanned with OKEN Scanner

Provided that preference may be given to the candidates possessing Diploma in Medical Laboratory Technology of Haffkine Institute.

4. Appointment to the posts by promotion and nomina- shall be made in the ratio 25:75:

Provided that if in the opinion of the appointin authority the exigency of services so requires, it may, wherever necessary make appointments to the posts of Laboratory Technician by nomination in relaxation of the percentage of the ratio prescribed for recruitment under this rule.

5. A person appointed to the post whether by promo or nomination shall be required to pass examinations in H and Marathi according to the rules made in that behalf, un he has already passed, or has been exempted from passing examinations.

6. A person appointed to the post shall be liable transfer anywhere in the State of Maharashtra in the cadı Laboratory Technician.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Sd/-

V.S.Kanthak,
Under Secretary to Government.

To,

The Jt.Director of Health Services,
(Health)M.S.Pune-1,

Scanned with OKEN Scanner